सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २१२ | शुक्रवार, दि. २४ एप्रिल २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com



आजचे अभीष्टचिंतन





श्री. संजय पवार
जिल्हाध्यक्ष – राष्ट्रवादी काँग्रेस



श्री. आकाश विवेक देशमुख
आर्किटेक्ट


## अमळनेर नगरपरिषदेचा स्मार्ट निर्णय

# पन्नास पथदिवे टायमरने नियंत्रणात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : नगरपरिषदेने पथदिवे सुरू आणि बंद होण्यामधील तफावत दूर करण्यासाठी व विजेच्या बिलात बचत करण्यासाठी आता शहरात ५० टायमर लावण्याचा निर्णय घेतला आहे.अमळनेर शहरात ६ हजार ५०० पथदिवे असून ते सुरू आणि बंद करण्यासाठी ५० पॉइंट आहेत.

दोन कामगार देखील लावण्यात आले आहेत. मात्र शहराचा विस्तार मोठा असून तीन चौरस किमी परिसर असल्याने एका कोपऱ्यापासून तर शेवटच्या कोपऱ्यापर्यंत जायला खूप वेळ लागतो. परिणामी काही दिवे उजेड असताना लावली जातात तर काही ठिकाणी अंधार पडून देखील दिवे लागत नव्हते. सकाळी देखील उशिरा बंद व्हायचे यामुळे



वीज वाया जाऊन जादा बिल येत होते. त्याचप्रमाणे काही ठिकाणी वात्रट पणा करून दिवसा दिवे सुरू करायचे किंवा पथदिव्यावरून वीज चोरी करायचे.

हा सारा प्रकार बंद करण्यासाठी माजी आमदार शिरीष चौधरी यांच्या मार्गदर्शनानुसार लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ परीक्षित बाविस्कर, उपनगराध्यक्ष प्रशांत निकम, मुख्याधिकारी गणेश शिंदे यांच्यासह सर्व नगरसेवकांनी बैठकीत निर्णय घेतला की सर्व १५० पॉईंट ५० पॉईंट मध्ये रूपांतर करून टायमर लावल्यास एकाच वेळी दिवे सुरू होतील आणि एकाच वेळी बंद होतील. आपोआप ही प्रक्रिया होणार असल्याने मानवी हस्तक्षेप थांबून विद्युत बिलात मोठी बचत होणार आहे. त्याचप्रमाणे नागरिकांच्या तक्रारींवरून पथदिवे लटकवून कसे तरी लावले जात होते. त्यामुळे ते वाऱ्याने हलून प्रकाश कुठे तरी पडायचा. प्रत्येक खांबावर पाईप क्लॅम्प लावण्यात यावेत अशी मागणी नागरिकांनी केली होती ती देखील मंजुर करण्यात आली आहे.

> नगरपरिषदसोशल मीडियावरील नंबर वर तक्रारी प्राप्त होऊन त्याचे निराकरण ४८ तासात केले जाते. ५० टायमर चा ठराव मंजूर करण्यात आला आहे. बचत करून जनतेला मूलभूत सुविधा देण्याचा पालिकेचा प्रयत्न सुरू आहे.
>
> **– डॉ परीक्षित बाविस्कर , नगराध्यक्ष अमळनेर**

> पालिकेने यापूर्वी सी एस आर फंड व विविध मदतीतून इमारतीवर सोलर लावल्याने नगरपरिषद कार्यालयाचे बिल शून्य झाले आहे. पालिका ऊर्जा बचतीचे काम करीत आहे.
>
> **–गणेश शिंदे , मुख्याधिकारी ,अमळनेर**

> पालिकेने सुरुवातीला हा प्रयोग पैलाड भागातील चार पॉईंट ला केल्याने प्रत्येक पॉईंट वरील पाच ते सहा हजार रुपये विद्युत बिलाची बचत झाली आहे. आणि पैलाड भागात दिवे बंद चालू करण्याचे कष्ट वाचले आहेत.
>
> **– कुणाल महाले , विद्युत अभियंता, नगरपरिषद अमळनेर**

## जागतिक पृथ्वी दिनानिमित्त नगरपरिषदेचा हरित उपक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : जागतिक पृथ्वी दिनानिमित्त अमळनेर नगर परिषदेतर्फे शहरात विविध पर्यावरणपूरक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत मुंबई गल्ली येथील नगर परिषद दवाखाना परिसरात वृक्षारोपण करून पृथ्वी दिन उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाचे उद्घाटन नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर व मुख्याधिकारी गणेश शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. परिसर हरित करण्याच्या दृष्टीने या उपक्रमाला विशेष महत्त्व देण्यात आले.कार्यक्रमादरम्यान उपस्थित सर्वांनी पर्यावरण संवर्धनाची गरज अधोरेखित करत हरित शपथ घेतली. वसुंधरेचे संरक्षण ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे हा संदेश देत शहर स्वच्छ, सुंदर आणि हरित ठेवण्यासाठी प्रत्येक नागरिकाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.या प्रसंगी नगर परिषद अमळनेरचे स्वच्छता निरीक्षक संतोष जाधव, किरण कंडारे, प्र. मुकादम गौतम बिऱ्हाडे यांच्यासह महिला हौसिंग ट्रस्टच्या महिला पदाधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.






अमळनेर : विविध प्रलंबित मागण्यांसाठी महसूल कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी व सदस्य बेमुदत संपात सहभागी होवून जोरदार निदर्शने व घोषणाबाजी करताना.

# बेमुदत संपात अमळनेर महसूल कर्मचारी संघटना सहभागी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : विविध प्रलंबित मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य सरकारी मध्यवर्ती कर्मचारी संघटनेने पुकारलेल्या बेमुदत संपात अमळनेर तालुका महसूल कर्मचारी संघटनेने सक्रिय सहभाग नोंदविला.

संपाच्या पार्श्वभूमीवर तहसील कार्यालय परिसरात कर्मचाऱ्यांनी एकत्र येत जोरदार निदर्शने व घोषणाबाजी केली.महसूल कर्मचारी संघटना ही राज्य सरकारी मध्यवर्ती कर्मचारी संघटनेशी संलग्न असल्याने सर्व पदाधिकारी व सदस्यांनी एकदिलाने संपात सहभागी होत आपल्या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. यावेळी कार्यालयीन कामकाजावरही काही प्रमाणात परिणाम झाल्याचे दिसून आले.

या संपामागील प्रमुख मागण्यांमध्ये सन २००५ नंतर शासकीय सेवेत नियुक्त झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणे, तसेच सुधारित राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेबाबत सविस्तर अधिसूचना तात्काळ जाहीर करणे यांचा समावेश आहे. याशिवाय इतर विविध प्रशासकीय व आर्थिक मागण्यांसाठीही आंदोलन छेडण्यात आले आहे. संघटनेचे तालुकाध्यक्ष अनिल चौधरी यांनी सांगितले की, शासनाने कर्मचाऱ्यांच्या न्याय्य मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष देऊन त्वरित सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल. या आंदोलनात उपाध्यक्ष रुपाली अडकमोल, सरचिटणीस मुकेश काटे यांच्यासह संघटनेचे असंख्य सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# नगरपरिषदेत कचरा वेचकांसाठी कार्यशाळा

## स्वच्छता व आर्थिक सक्षमीकरणावर प्रशिक्षण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : दि. २२ एप्रिल स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत क्षमता बांधणी घटकाच्या माध्यमातून अमळनेर नगर परिषद हद्दीतील कचरा वेचकांसाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालय, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) आणि अमळनेर नगर परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने ही कार्यशाळा इंदिरा गांधी भवन येथे दुपारी २ ते ५.३० या वेळेत पार पडली.

मुख्याधिकारी श्री. गणेश शिंदे आणि नगर परिषदेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यशाळेत शहरातील घंटागाडी चालक, मदतनीस, तसेच घनकचरा प्रक्रिया केंद्रावर कार्यरत कर्मचारी व सुपरवायझर यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.प्रशिक्षणासाठी स्वच्छ महाराष्ट्र अभियान



अमळनेर : नगरपरिषद हद्दीतील कचरा वेचकांसाठी विशेष कार्यशाळेत उपस्थित प्रशिक्षणार्थी

संचालनालयामार्फत नियुक्त त्रयस्थ संस्था 'कुशाग्र फाउंडेशन'च्या अधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले. यामध्ये केंद्र सरकारच्या विविध योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली.

विशेषतः 'नमस्ते योजना', 'एनयूएलएम ', 'ई-श्रम कार्ड', आधार कार्ड, बचत गट स्थापना, घनकचऱ्यातून उपलब्ध होणाऱ्या व्यवसाय संधी, तसेच आरआरआर केंद्र याबाबत उपयुक्त माहिती सहभागींना देण्यात आली.कचरा वेचकांचे तसेच त्यांच्या कुटुंबीयांचे जीवनमान उंचावणे आणि आर्थिक प्रगती साधणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता.

यासोबतच 'जागतिक पृथ्वी दिना'चे औचित्य साधून घनकचरा व्यवस्थापन, पर्यावरणीय बदल याबाबत मार्गदर्शन करण्यात आले आणि उपस्थितांना हरित शपथ देण्यात आली. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व सहभागींना प्रमाणपत्रे व भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.या उपक्रमावेळी स्वच्छता निरीक्षक श्री. संतोष जाधव, श्री. किरण कंडारे, शहर समन्वयक श्री. गणेश गढरी, कुशाग्र फाउंडेशनचे अधिकारी श्री. देवेंद्र केळोदे, श्री. मुकेश चव्हाण, श्री. प्रज्वल शेवलकर, तसेच युनुस शेख, अनंत संदानशिव, जया सरदार, घनकचरा सुपरवायझर श्री. खलील शहा, श्री. राजेंद्र गोलहीत आदी उपस्थित होते.


राष्ट्रवादी काँग्रेसचा आज भव्य बूथ मेळावा
पान २ वर...

अपमानाचे घोट पचवून साध्य केले ध्येय
पान ३ वर...

आज गंगा सप्तमी त्यानिमित्ताने..
पान ४ वर...


## दिनविशेष

२४ एप्रिल

- राष्ट्रीय पंचायत राज दिवस
- बहुपक्षीयता आणि शांततेसाठी आंतरराष्ट्रीय दिवस
- भोर-वाई प्रांतातील केंजळगड शिवाजी महाराजांनी स्वारी करून जिंकला.
- खंडेराव दाभाडे यांनी अहमदनगर येथे मोगलांचा पराभव केला.
- दिल्लीहून श्रीनगरला जाणारे इंडियन एअरलाइन्सचे फ्लाइट ४२७ दहशतवाद्यांनी अपहरण केले. सर्व १४१ प्रवाशांची सुखरूप सुटका करण्यात आली.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!

जय भारत...!

**जय स्वदेशी...!!**

श्री मंगलग्रह मंदिर अमळनेर

## भूमी सुपोषण अभियान राष्ट्रीय चळवळ

माता भूमि: पुत्रो अहं पृथिव्या:
भूमि सुपोषण एवं संरक्षण अभियान

# भूमीला सुजलाम-सुफलाम करण्यासाठी जागर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर: वाढता रासायनिक खतांचा वापर आणि त्यामुळे खालावलेली जमिनीची सुपीकता यावर मात करण्यासाठी अमळनेर तालुक्यात भूमी सुपोषण राष्ट्रीय अभियानाने चळवळ उभी केली आहे. आपल्या अन्नदात्या भूमीला पुन्हा एकदा सुजलाम-सुफलाम करण्यासाठी आणि शेतीला तिचे हरवलेले गतवैभव मिळवून देण्यासाठी हे अभियान आता तालुक्यातील घराघरांत पोहोचत आहे.




अमळनेर : भूमी सुपोषण राष्ट्रीय अभियान चळवळ रथाचे अवलोकन करताना शेतकरी व ग्रामस्थ.

गुरुवार दि. २३ ला रथाने सकाळी झाडी, एकतास, एकलहरे, भरवस, शहापूर, भिलाली, तांदळी, खेडी, करणखेडा व खापरखेडे अंबारे या गावांमध्ये रथाचे जोरदार स्वागत करण्यात आले. जमिनीची सुपीकता टिकवून ठेवणे ही केवळ गरज नसून ते आपले कर्तव्य आहे, हा संदेश या पूजनाच्या माध्यमातून दिला जात आहे.रासायनिक शेतीचे मानवी आरोग्यावर आणि जमिनीवर होणारे दुष्परिणाम, तसेच जैविक (सेंद्रिय) शेतीचे दीर्घकालीन फायदे सांगणारी माहितीपत्रके प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहोचवली जात आहेत.यावेळी शेतकरी आणि ग्रामस्थांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे देवून त्यांचे समाधान करण्यात आले. या मोहिमेला महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाचे तांत्रिक आणि मोलाचे सहकार्य लाभत आहे. अक्षय कृषी परिवार आणि मंगळग्रह सेवा संस्था, अमळनेर यांच्या संयुक्त विद्यमाने हे अभियान राबवले जात आहे.शेतकऱ्यांचा वाढता प्रतिसाद तालुक्यातील शेतकरी या रथाचे ठिकठिकाणी स्वागत करत असून, सेंद्रिय शेतीकडे वळण्याचा निर्धार करत आहेत. विशेषतः तरुण शेतकऱ्यांमध्ये या अभियानाबाबत मोठी उत्सुकता पाहायला मिळत आहे.


प्रिय..
मित्र, नातेवाईक व सहकारी
सस्नेह नमस्कार
आपण सर्वांनी माझ्या जन्म दिनाच्या
आठवणीने भेटून, फोनद्वारे
सदकामना दिल्यात, तुम्ही सर्वजण
जगण्यातील आनंदाचं बळ आहात,
हे मला मिळत राहील या इच्छेसह
स्नेह ऋणी आहे.
आपला स्नेही
चेतन सोनार



चेतश्री प्रकाशन
Chetan Sonar Architect Pvt. Ltd.
वास्तुचैतन्य, वास्तु सर्वे कन्सल्टन्सी, अमळनेर.

संपादकीय

# काळाच्या आरपार जाणारा ज्ञानप्रवास

२३ एप्रिल हा दिवस जागतिक स्तरावर 'पुस्तक आणि कॉपीराइट दिन' म्हणून साजरा केला जातो. युनेस्कोने या दिनाची निवड करण्यामागे एक विशेष संदर्भ आहे; २३ एप्रिल हा विल्यम शेक्सपिअर, मिगेल दि सर्व्हान्तेस आणि इंका गार्सिलासो दे ला वेगा यांसारख्या महान लेखकांच्या स्मृतिदिनाशी संबंधित आहे. वाचनाची संस्कृती जोपासणे, पुस्तकांशी मानवाचे नाते दृढ करणे आणि लेखकांच्या कार्याचा गौरव करणे, हा या दिनाचा मुख्य उद्देश आहे. आजच्या वेगवान डिजिटल युगात, जिथे माहितीचा महापूर आहे आणि तंत्रज्ञानाच्या स्क्रीनवर मजकूर सतत बदलत असतो, तिथे पुस्तकांचे महत्त्व कमी झाले आहे का? याचे उत्तर ठळकपणे 'नाही' असे आहे. उलट, गोंधळलेल्या आणि धावपळीच्या या काळात पुस्तके अधिक महत्त्वाची ठरत आहेत.

पुस्तके ही केवळ कागदाची पाने किंवा शाईने भरलेली अक्षरे नसून, ती मानवी संस्कृतीचा वारसा आहेत. एक पुस्तक वाचणे म्हणजे लेखकाच्या अनुभवांतून, विचारांतून आणि कल्पनाशक्तीतून प्रवास करणे. ते आपल्याला अशा जगाची सफर घडवते, जिथे आपण प्रत्यक्ष पोहोचू शकत नाही. वाचन हे माणसाला केवळ साक्षर बनवत नाही, तर ते संवेदनशील, तर्कनिष्ठ आणि सहिष्णू बनवते. जेव्हा आपण एखादी कादंबरी वाचतो, तेव्हा आपण दुसऱ्याच्या दुःखाशी किंवा सुखाशी एकरूप होतो, ज्यामुळे आपल्यातील सहानुभूती वाढते.सध्याच्या काळात वाचनसंस्कृतीसमोर 'स्क्रीन'चे मोठे आव्हान आहे. सोशल मीडियावरील क्षणभंगुर पोस्ट्स आणि व्हिडिओंच्या आहारी गेलेल्या तरुण पिढीला पुस्तकांपर्यंत कसे आणायचे, हा चिंतेचा विषय आहे. माहिती आणि ज्ञान यातील फरक समजून घेणे आवश्यक आहे. गुगलवर मिळणारी माहिती हे ज्ञान नाही; ज्ञान हे सखोल अभ्यासातून, चिंतनातून आणि पुस्तकांच्या वाचनातूनच मिळते. पुस्तके आपल्याला एकाग्रता शिकवतात. स्मार्टफोनवर माहिती वाचताना आपण अनेकदा विचलित होतो, पण पुस्तक हातात असताना मिळणारा आनंद आणि एकाग्रता अतुलनीय असते.वाचनाच्या सवयीमुळे भाषेवर प्रभुत्व मिळते. विचारांची स्पष्टता येते. म्हणूनच म्हटले जाते, "जो वाचतो, तो जगतो." पुस्तक हे असे एक मित्र आहे जे कधीही तक्रार करत नाही, उलट आपल्याला समृद्ध करते. आपण कितीही श्रीमंत झालो तरी, पुस्तकांशिवाय आलेला समृद्धीचा अनुभव अपूर्णच असतो. महात्मा गांधी म्हणतात "पुस्तकांचे मूल्य रत्नांपेक्षाही अधिक आहे, कारण रत्ने केवळ बाह्य चकाकी दाखवतात, तर पुस्तके अंतःकरण उजळून टाकतात." पुस्तकांशी मैत्री केली तर आयुष्यभराची साथ देणारे अनेक जिवलग सोबती आपल्याला मिळू शकतात; त्यातून आपले एक वेगळेच विश्व तयार होते. वाचनाने ज्ञानप्राप्ती, मनोरंजन, बौद्धिक आणि मानसिक विकास अशा अनेक गोष्टी साध्य होतात. जेव्हा आपण अनेक भाषांतील आणि अनेक प्रकारचे साहित्य वाचतो, तेव्हा आपले अनुभवविश्व समृद्ध होत जाते. आपले जग ठराविक गोष्टींपुरते मर्यादित न राहता विस्तारत जाते आणि आपल्या जाणिवा प्रगल्भ होतात.आजच्या पिढीमध्ये सखोल वाचन करणारे वाचक खूप कमी आढळतात. वाचन करणारा तरुण वर्ग आहे, पण त्यांचे एकूण प्रमाण घटलेले दिसते. आजचे जग 'स्मार्ट' आणि 'फास्ट' झाले आहे, जिथे वेळ ही अत्यंत मौल्यवान गोष्ट बनली आहे. सहसा थोडा मोकळा वेळ मिळाला की, लोकांचा कल स्मार्टफोनकडे असतो. त्यात कामाव्यतिरिक्त व्हॉट्सॲप, फेसबुक, गेम्स, चित्रपट, फोटो आणि रिल्स पाहणे सुरू असते. संगणक किंवा मोबाईलवर वाचलेली माहिती ही क्षणभंगुर असते. त्यामुळे जे सखोल ज्ञान पुस्तके देऊ शकतात, ते ही साधने देऊ शकत नाहीत.

आजच्या जागतिक पुस्तक दिनानिमित्त, आपण केवळ पुस्तके भेट देण्यापुरते मर्यादित न राहता, ती वाचण्याचा संकल्प केला पाहिजे. आपल्या घरातील मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, हे पालकांचे आणि शिक्षकांचे मोठे कर्तव्य आहे. सार्वजनिक ग्रंथालयांचे बळकटीकरण करणे आणि पुस्तकांच्या प्रदर्शनांना भेट देणे ही वाचनसंस्कृती वाढवण्याची मोठी पावले ठरू शकतात.पुस्तके ही प्रकाशाची द्वारे आहेत. अज्ञानाचा अंधकार दूर करण्याची ताकद केवळ पुस्तकांमध्येच आहे. तंत्रज्ञान कितीही पुढे गेले, तरी पुस्तकाचा सुगंध आणि पानांचा स्पर्श याला पर्याय नाही. चला, आज पुन्हा एकदा पुस्तकांशी मैत्री करूया. कारण शेवटी, पुस्तकेच आपल्याला माणुसकीची आणि विवेकाची ओळख करून देतात."पुस्तक हे संकटात आधार देणारे, एकांतात सोबती असणारे आणि यशाच्या मार्गावर दिशा दाखवणारे एकमेव मार्गदर्शक आहे."

## राष्ट्रीय पंचायत राज दिवस



ग्लोबल महातेज वृत्तसेवा

भारतात पंचायती राज व्यवस्थेच्या स्थापनेच्या स्मरणार्थ दरवर्षी २४ एप्रिल रोजी राष्ट्रीय पंचायती राज दिन साजरा केला जातो. १९९३ च्या ७३ व्या घटनादुरुस्ती कायद्याद्वारे सुरू करण्यात आलेल्या या विकेंद्रित शासनप्रणालीचा उद्देश, ग्रामपंचायती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गाव पातळीवरील स्थानिक स्वशासकीय संस्थांना सक्षम करणे हा आहे.पंचायती राजच्या संकल्पनेची मुळे प्राचीन भारतीय परंपरेत रुजलेली आहेत, जिथे ग्राम परिषदा किंवा पंचायती स्थानिक प्रशासनात महत्त्वाची भूमिका बजावत असत. तथापि, २० व्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत या व्यवस्थेचे पुनरुज्जीवन करून तिला घटनात्मक दर्जा देण्यात आला नव्हता.१९५७ मध्ये, लोकशाही विकेंद्रीकरणाच्या प्रक्रियेचा अभ्यास करण्यासाठी आणि पंचायती राज व्यवस्थेला पुनरुज्जीवित करण्यासाठी उपाययोजना सुचवण्यासाठी बळवंतराय मेहता समितीची स्थापना करण्यात आली. समितीच्या शिफारशींमुळे गाव, तालुका आणि जिल्हा स्तरावर पंचायतींची त्रिस्तरीय व्यवस्था स्थापन झाली.पंचायती राज प्रणालीचा उद्देश नागरिकांना त्यांच्या समुदायांवर थेट परिणाम करणाऱ्या निर्णय प्रक्रियेत सामील करून सहभागी लोकशाहीला प्रोत्साहन देणे हा आहे. ही प्रणाली स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या विशिष्ट गरजांनुसार विकास कार्यक्रमांचे नियोजन आणि अंमलबजावणी करण्याचे अधिकार देते.सत्तेचे विकेंद्रीकरण करून, पंचायती राज प्रणाली हे सुनिश्चित करते की विकास उपक्रम अधिक सर्वसमावेशक आणि ग्रामीण भागांच्या विविध गरजांना प्रतिसाद देणारे असतील. तसेच, शासनाला लोकांच्या जवळ आणून ती पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाला प्रोत्साहन देते.राष्ट्रीय पंचायती राज दिन २०२४ रोजी, देश ७३ व्या घटनादुरुस्ती कायद्याचा ३१ वा वर्धापन दिन साजरा करेल. जरी कोणतीही विशिष्ट संकल्पना जाहीर केली जाणार नसली तरी, देशभरातील पंचायतींच्या उत्कृष्ट कार्याला मान्यता देणारे कार्यक्रम आणि पुरस्कार सोहळे आयोजित करून हा दिवस साजरा केला जाईल.ग्रामीण कुटुंबांचे जीवनमान सुधारण्यासाठी आणि शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी केलेल्या प्रयत्नांचे कौतुक करण्याचा हा पुरस्कार एक मार्ग आहे. ते सर्वोत्तम पद्धतींना प्रोत्साहन देतात आणि इतर पंचायतींना उत्कृष्टतेसाठी प्रयत्न करण्याची प्रेरणा देतात.भारत सर्वसमावेशक विकासाच्या मार्गावर प्रगती करत असताना, प्रभावी स्थानिक प्रशासनाचे महत्त्व कमी लेखता येणार नाही. हवामान बदल, ग्रामीण-शहरी स्थलांतर यांसारख्या आव्हानांना सामोरे जाण्यात आणि न्याय्य विकास सुनिश्चित करण्यात पंचायती राज संस्था महत्त्वाची भूमिका बजावतात.या राष्ट्रीय पंचायती राज दिनानिमित्त, पंचायती राज संस्थांच्या यशावर आणि त्यांच्यासमोरील आव्हानांवर चिंतन करणे आणि त्यांना अधिक बळकट व सक्षम करण्याचे मार्ग शोधणे महत्त्वाचे आहे. असे केल्याने, भारत एक अशी मजबूत आणि खऱ्या अर्थाने सहभागी लोकशाही निर्माण करू शकेल, जिथे कोणीही मागे राहणार नाही.

# अठ्ठेचाळीस तासात उपाययोजना न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : शहरात निर्माण झालेल्या भीषण पाणीटंचाईमुळे नागरिकांचा संताप उफाळून आला असून अमळनेर नगरपरिषद प्रशासनाला ४८ तासांचा अल्टिमेटम देण्यात आला आहे. "दोन दिवसाआड पाणीपुरवठा" करण्याचा दावा प्रत्यक्षात पूर्णपणे कोलमडला असून अनेक भागांमध्ये नागरिकांना तब्बल ७ ते ८ दिवसांनी पाणी मिळत असल्याची गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे.

या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या वतीने मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.मुख्याधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले की, पाणी हा जीवनावश्यक घटक असून त्याचा नियमित पुरवठा करणे ही स्थानिक स्वराज्य संस्थेची कायदेशीर जबाबदारी आहे.




*अमळनेर: नगरपरिषद मुख्याधिकारी गणेश शिंदे यांना निवेदन देताना भूषण भदाणे, सनी गायकवाड, मनिष देसले, चेतन पाटील आदी*

मात्र, प्रत्यक्षात पाणीपुरवठा होत नसतानाही नागरिकांकडून पाणीपट्टीची सक्तीने वसुली सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. याशिवाय थकबाकीच्या कारणावरून नळ कनेक्शन तोडण्याच्या कारवाया केल्या जात असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

नागरिकांनी प्रशासनासमोर ४८ तासांत नियमित पाणीपुरवठा सुरू करणे, अधिकृत वेळापत्रक जाहीर करणे, टँकरद्वारे पर्यायी व्यवस्था उपलब्ध करणे, पाणीपट्टी वसुली तात्पुरती थांबवणे तसेच नळ कनेक्शन तोडण्याच्या कारवाया स्थगित करणे अशा प्रमुख मागण्या मांडल्या आहेत. या मागण्या निर्धारित वेळेत पूर्ण न झाल्यास जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल करून तीव्र लोकआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा नागरिकांनी दिला आहे. "पाणी हा आमचा हक्क आहे, भीक नाही! सेवा द्या, अन्यथा परिणामांना सामोरे जा!" अशी ठाम भूमिका नागरिकांनी व्यक्त केली. निवेदन देताना राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष भूषण भदाणे, सनी गायकवाड, मनिष देसले, चेतन पाटील आदी प्रतिनिधी उपस्थित होते.

# राष्ट्रवादी काँग्रेसचा आज भव्य बूथ मेळावा

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



अमळनेर : लोकशाहीची खरी ताकद बूथ स्तरावर उभी राहते आणि संघटनेचे बळ कार्यकर्त्यांच्या एकजुटीतून निर्माण होते, या भूमिकेतून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने अमळनेर मतदारसंघाचा भव्य बूथ मेळावा अमळनेरात आयोजित करण्यात आला आहे.

हा मेळावा शुक्रवार, दि. २४ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता बन्सीलाल पॅलेस येथे माजी मंत्री तथा आमदार अनिल भाईदास पाटील व जिल्हाध्यक्ष संजय पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. या मेळाव्यात आगामी राजकीय घडामोडी, संघटन मजबुती, तसेच बूथ स्तरावरील नियोजन आणि कार्यपद्धती याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात येणार आहे. 'प्रत्येक बूथ अधिक सक्षम करण्यासाठी हा मेळावा अत्यंत महत्त्वाचा आहे,' सर्व बीएलए (बूथ लेव्हल एजंट), कार्यकर्ते, पदाधिकारी तसेच लोकप्रतिनिधींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.आपली उपस्थिती ही केवळ सहभाग नसून संघटनेच्या बळकटीसाठी महत्त्वपूर्ण योगदान ठरेल, असे नमूद करत 'एकजुटीने कार्य करून अमळनेर मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अधिक सक्षम व प्रभावी बनवूया,' असे आवाहन करण्यात आले आहे.

## जनगणना २०२७ : दोन टप्प्यांत प्रशिक्षणाचे आयोजन

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : भारत सरकारच्या जनगणना २०२७ मोहिमेअंतर्गत तालुक्यातील प्रगणक (इन्यूमरेटर), पर्यवेक्षक (सुपरवायझर) तसेच राखीव कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रशिक्षण दोन टप्प्यांत पार पडणार असून दि. २३ ते २५ एप्रिल तसेच दि. २७ ते २९ एप्रिल या कालावधीत अमळनेर येथील ग्लोबल व्ह्यू स्कूलमध्ये सकाळी ९.३० ते सायंकाळी ६.०० या वेळेत सत्रे आयोजित करण्यात आली आहेत, अशी माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

तहसीलदार रुपेशकुमार सुराणा यांनी सांगितले की, जनगणना अधिनियम १९४८ व जनगणना नियम १९९० तसेच भारत सरकारच्या जनगणना संचालनालयाच्या निर्देशांनुसार हा प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. संबंधित सर्व नियुक्त प्रगणक, पर्यवेक्षक व राखीव कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणास अनिवार्य उपस्थित राहण्याचे आदेश देण्यात आले असून कोणतीही गैरहजेरी सहन केली जाणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.प्रशिक्षणासाठीचे नियुक्ती आदेश तात्काळ संबंधितांना देऊन त्याची पोहोच उलटटपाली सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

प्रशिक्षणादरम्यान सहभागी कर्मचाऱ्यांसाठी दोन वेळा चहा तसेच दुपारच्या जेवणाची व्यवस्था करण्यात आल्याची माहिती प्रशासनाने दिली. जनगणना २०२७ ची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी हे प्रशिक्षण अत्यंत महत्त्वाचे मानले जात असून तालुक्यातील सर्व संबंधित यंत्रणा सज्ज करण्यात येत असल्याची माहिती तहसीलदार रुपेशकुमार सुराणा यांनी दिली आहे.

## शेजाऱ्याची लोखंडी रॉडने मारहाण, गुन्हा दाखल

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथील आमलेश्वर नगर परिसरात किरकोळ वादातून शेजाऱ्याने लोखंडी रॉडने मारहाण केल्याची घटना घडली असून, या प्रकरणी अमळनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.तक्रारदार हा पत्नी उज्वला, आई निर्मला, वडील मगन महाजन व मुलांसह राहत असून साबण विक्री करून उदरनिर्वाह करतो. त्याच्या घरासमोर राहणारा गणेश पांडुरंग महाजन याच्याशी त्याची ओळख आहे.दि. २१ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ५.४५ वाजता तक्रारदाराच्या पत्नीने फोन करून सांगितले की, गणेश महाजन हा त्यांच्या घरासमोर येऊन मुलांमध्ये झालेल्या किरकोळ कारणावरून शिवीगाळ करत आहे. त्यानंतर तक्रारदार घरी पोहोचला असता आरोपी घरासमोर उभा राहून शिवीगाळ करत होता. तक्रारदाराने त्याला शांत राहण्यास सांगितले असता आरोपी संतापून त्याच्या हातातील लोखंडी रॉडने तक्रारदाराच्या उजव्या हातावर मारहाण केली. यावेळी तक्रारदाराची पत्नी मध्यस्थी करण्यास आली असता आरोपीने तिलाही शिवीगाळ करून तुला संपवून टाकेन अशी धमकी दिली.त्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पसार झाला. जखमी तक्रारदाराने प्रथम अमळनेर पोलीस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांनी दिलेल्या मेमोवरून त्याच्यावर ग्रामीण रुग्णालय, अमळनेर येथे प्राथमिक उपचार करण्यात आले. पुढील उपचारासाठी त्याला हिरे मेडिकल कॉलेज, धुळे येथे हलविण्यात आले असून त्याच्या हाताला प्लास्टर करण्यात आले.उपचारानंतर तक्रारदाराने आरोपी गणेश पांडुरंग महाजन (रा. आमलेश्वर नगर, अमळनेर) याच्याविरुद्ध तक्रार दाखल केली असून पोलिसांनी गुन्हा केला असून पुढील तपास पो.कॉ नितीन मनोरे करीत आहेत.



*अमळनेर: जागतिक पुस्तक दिन साजरा करताना फार्मसी महाविद्यालयातील शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी .*

# पुस्तके ही ज्ञानाचा जिवंत वारसा : प्रा. प्रितम पाटील

## फार्मसी महाविद्यालयात जागतिक पुस्तक दिन उत्साहात साजरा

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर :"पुस्तके ही केवळ कागदाची पाने नसून ती ज्ञानाचा जिवंत वारसा आहेत. आजच्या डिजिटल युगात माहिती सहज उपलब्ध असली, तरी वैचारिक प्रगल्भतेसाठी पुस्तकांचे वाचन करणे अनिवार्य आहे," असे प्रतिपादन खान्देश शिक्षण मंडळ संचलित स्व.श्री.पंढरीनाथ छगनशेठ भांडारकर कॉलेज ऑफ डी.फार्मसी आणि स्व. प्रा. आर. के. केले कॉलेज ऑफ बी. फार्मसीचे प्रभारी प्राचार्य प्रितम पाटील यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाच्या ग्रंथालयात ग्रंथपाल सुजित अमळकर व शिवाजी पाटील यांच्या हस्ते पुस्तकांचे पूजन करून करण्यात आली. यावेळी बोलताना प्राचार्य पाटील यांनी विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यासक्रमापुरते मर्यादित न राहता अवांतर वाचन करून आपले व्यक्तिमत्व समृद्ध करावे, असे आवाहन केले. तसेच ग्रंथालयातील दुर्मिळ ग्रंथांचे जतन करून वाचन चळवळ अधिक व्यापक करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.कार्यक्रमाची सांगता विशेष ग्रंथ प्रदर्शनाने झाली, ज्यात विविध विषयांवरील नामवंत लेखकांची पुस्तके मांडण्यात आली होती. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी या उद्देशाने राबवण्यात आलेल्या या उपक्रमाचे नियोजन प्रा. सतिष ब्राम्हणे यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या यशस्वी आयोजनाबद्दल खान्देश शिक्षण मंडळाचे फार्मसी विभागाचे चेअरमन मा. योगेशजी मुंदडे यांनी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक केले.

# विरांगणा सहेली कार्यकारिणी जाहीर

## जायन्ट्स ग्रुप ऑफ विरांगणा सहेली अध्यक्षपदी सुदर्शना पाटील

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : सामाजिक बांधिलकी जपत गेल्या तीन वर्षांपासून सातत्याने विविध उपक्रम राबवणाऱ्या जायन्ट्स ग्रुप ऑफ विरांगणा सहेली, अमळनेर या संस्थेची २०२६-२७ वर्षासाठी नवी कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली असून अध्यक्षपदी सुदर्शना पाटील यांची निवड करण्यात आली आहे.संस्थापक अध्यक्ष दिपिका सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेने आतापर्यंत अनेक समाजोपयोगी उपक्रम राबवले आहेत.




**अमळनेर : जायन्ट्स ग्रुप ऑफ विरांगणा सहेली, अमळनेर या संस्थेच्या संस्थापक अध्यक्ष दिपीका सोनवणे, नवीन अध्यक्ष सुदर्शना पाटील व इतर पदाधिकारी**

नव्या कार्यकारिणीच्या स्थापनेचा प्रारंभही सामाजिक कार्यानेच करण्यात आला. युनिक क्लासमधील विद्यार्थ्यांसाठी मोफत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत जे. बी. इन्स्टिट्यूटच्या संचालिका मेघा मुंदडा यांनी मुलांना पान-फुलांपासून विविध आकर्षक वस्तू तयार करण्याचे कौशल्य शिकवले. या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

नवीन कार्यकारिणीच्या माध्यमातून महिलांच्या सक्षमीकरणाबरोबरच शिक्षण, आरोग्य व सामाजिक क्षेत्रात अधिक प्रभावी उपक्रम राबवण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला आहे.चौकट अशी आहे नवीन कार्यकारिणी नवीन कार्यकारिणीत उपाध्यक्षपदी अनिता राजेंद्र महाले व विद्या पाटील, सचिवपदी अलका पाटील, तर खजिनदारपदी शोभा पाटील यांची निवड करण्यात आली आहे. याशिवाय जयश्री सोनवणे, उज्वला निकुंभ, पुष्पाबाई पाटील, मनीषा पाटील, अलका बोडरे व भारती शिंदे यांची संचालक मंडळात नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच नीलिमा माहेश्वरी व अपेक्षा पवार यांचीही विविध पदांवर निवड करण्यात आली आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# अपमानाचे घोट पचवून साध्य केले ध्येय
## पीसीएस सविता प्रधान यांच्या संघर्षाला सलाम !

सक्सेस स्टोरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आजच्या जगात, जेव्हा महिलांचे हक्क आणि समानतेवर चर्चा होत आहे, सरकार त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी अनेक योजना राबवत आहे, तेव्हा पीसीएस सविता प्रधान यांची कहाणी हा एक अंगावर काटा आणणारा प्रवास आहे. बालपणी गरिबीने वेढलेल्या आणि लग्नानंतर स्वतःच्याच कुटुंबाच्या दडपशाहीला सामोरे जाणाऱ्या एका महिलेने आपल्या धैर्याने आपल्या नशिबाची दिशा बदलली.



पीसीएस सविता प्रधान यांचा जन्म मध्य प्रदेशातील एका अत्यंत गरीब कुटुंबात झाला. त्यांचे सुरुवातीचे शिक्षण गावातील सरकारी शाळेत झाले. दहावीत चांगले गुण मिळाल्यावर त्यांच्या पालकांनी त्यांना शहरातील शाळेत दाखल केले. पण शहरात पोहोचणे सोपे नव्हते. बसचे भाडे फक्त २ रुपये होते, पण सविताकडे तेवढेही पैसे नव्हते. आपले शिक्षण सुरू ठेवण्यासाठी, ती शाळेपर्यंत कित्येक किलोमीटर चालत जायची.

नंतर, तिच्या आईला त्याच शहरात नोकरी मिळाली, ज्यामुळे तिचा त्रास कमी झाला आणि तिने आपले शालेय शिक्षण पूर्ण केले. जेव्हा सविताजींचे त्यांच्या इच्छेविरुद्ध लग्न झाले, तेव्हा त्यांचे आयुष्य पूर्णपणे बदलले. त्यांच्या सासरच्यांनी त्यांना शिक्षण सुरू ठेवू देण्याचे वचन दिले होते, पण लग्नानंतर त्यांनी ते पाळले नाही. त्यांना घरातील मोलकरणीपेक्षाही वाईट वागणूक दिली जात होती.त्यांना पोटभर जेवणही दिले जात नव्हते; भुकेमुळे त्या बाथरूममध्ये पोळ्या लपवून खायच्या.

शारीरिक आणि मानसिक छळ इतका तीव्र झाला होता की त्यांनी एकदा आत्महत्येचा प्रयत्न केला, पण खूप विचार करून त्यांनी ठरवले की त्या त्यांच्यासाठी आपला जीव देणार नाही. त्यानंतर त्या आपल्या दोन मुलांसह घरातून पळून गेल्या. घर सोडल्यानंतर, सविताने एका पार्लरमध्ये मदतनीस म्हणून काम करण्यास सुरुवात केली आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी शिकवणीही घेतली. या काळात त्यांनी पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. त्यांच्याकडे नवीन पुस्तके विकत घेण्यासाठी पैसे नव्हते, यावरून त्यांच्या धैर्याचा अंदाज येतो. परीक्षेच्या दिवशी त्यांच्या पतीने त्यांच्यावर लघवीने भरलेली बादलीसुद्धा फेकली, पण सविताजी दृढनिश्चयी राहिल्या आणि अंघोळ करून परीक्षा द्यायला गेल्या.एके दिवशी वर्तमानपत्रात जाहिरात पाहून सविताने परीक्षेची तयारी सुरू केली आणि त्यांच्या मेहनतीने त्या परीक्षा उत्तीर्ण होऊन अधिकारी झाल्या. पण पद मिळाल्यानंतरही त्यांचा पती त्यांचा छळ करत राहिला. तो त्यांचा कार्यालयात येऊन त्यांना मारहाण करायचा आणि पैसे हिसकावून घ्यायचा. सविताजींना वाटले की जर लोकांना तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल कळले तर तिचा आदर कमी होईल, म्हणून ती गप्प राहिली. अखेरीस, त्यांनी त्यांच्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याची (एसपी) मदत घेतली आणि आपल्या पतीला धडा शिकवला. आज सविताजी एक यशस्वी अधिकारी आहेत.

# संगीत आणि नाट्यसृष्टीतील एक युगप्रवर्तक
## मास्टर दीनानाथ मंगेशकर

स्मृतिदिन विशेष

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मराठी नाट्यसंगीत आणि शास्त्रीय गायनाच्या इतिहासात ज्यांनी स्वतःच्या सुरांनी आणि अभिनयाने एक सुवर्णकाळ निर्माण केला, ते म्हणजे मास्टर दीनानाथ मंगेशकर. एक प्रतिभावान गायक, थोर अभिनेते आणि संगीतकार म्हणून त्यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनावर अमिट छाप सोडली. २४ एप्रिल १९४२ रोजी त्यांनी अखेरचा श्वास घेतला, परंतु त्यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी आजही मराठी रसिक



मनांना जाणवते.दीनानाथजींचा जन्म गोव्यातील मंगेशी गावात झाला. त्यांचे वडील गणेशभट अभिषेकी हे स्वतः उत्तम कीर्तनकार होते, ज्यांच्याकडून दीनानाथजींना संगीताचे बाळकडू मिळाले. त्यांनी लहानपणीच शास्त्रीय संगीताचे शास्त्रोक्त शिक्षण घेतले. ग्वॉल्हेर घराण्याच्या गायकीची त्यांना विशेष ओळख होती. त्यांच्या आवाजात एक प्रकारची जादुई पकड होती, ज्यामुळे ते श्रोत्यांना मंत्रमुग्ध करत असत.नाट्यसंगीताचा पायाः त्यांनी अनेक संगीत नाटकांमध्ये आपल्या गायकीने आणि अभिनयाने जीव ओतला. 'भावबंधन', 'पुण्यप्रभाव', 'रणदुंदुभी' यांसारख्या नाटकांनी त्यांना लोकप्रियता मिळवून दिली.ते केवळ गायक नव्हते, तर 'बलवंत संगीत मंडळी' ही त्यांनी स्वतःची नाट्यसंस्था सुरू केली होती. त्या काळी त्यांनी ज्या पद्धतीचे संगीत आणि नाटके सादर केली, ती आजही एक मानदंड मानली जातात.दीनानाथ मंगेशकर हे केवळ एक कलाकार नव्हते, तर त्यांनी भारतीय संगीताला लता मंगेशकर, आशा भोसले, उषा मंगेशकर, मीना खडीकर आणि हृदयनाथ मंगेशकर यांच्यासारखी हिरेरत्ने दिली, ज्यांनी पुढे जाऊन जगभर भारतीय संगीताचा ध्वज फडकवला. दीनानाथजींचे निधन अत्यंत अकाली झाले. त्यांच्या पश्चात त्यांचे कुटुंब आणि त्यांच्या शिष्यांनी त्यांचा हा संगीताचा वारसा पुढे नेला. आजही त्यांच्या नावाने दिला जाणारा 'दीनानाथ मंगेशकर पुरस्कार' हा संगीत, कला आणि सामाजिक क्षेत्रातील दिग्गजांसाठी एक अत्यंत प्रतिष्ठेचा पुरस्कार मानला जातो.त्यांच्या स्मृतींना उजाळा देताना, केवळ एका महान गायकाचे निधन झाले असे वाटत नाही, तर एक संपूर्ण संगीत युग संपले असे जाणवते. त्यांच्या गाण्यांमधील भाव आणि अभिनयातील रसिकता आजही नवीन पिढीच्या कलाकारांना प्रेरणा देत आहे. आज त्यांच्या स्मृतीदिनी, मराठी संस्कृतीचे हे महान लेणे आपण विनम्रतेने अभिवादन करत आहोत. त्यांचे कार्य अमर आहे, कारण त्यांनी पेरलेली संगीताची बीजे आजही सुरावलीच्या रूपात जिवंत आहेत.

# शिवरायांचे भाऊ संभाजी राजे, कसा झाला त्यांचा मृत्यू?
## 'राजा शिवाजी' चित्रपटात अभिषेक बच्चन साकारतोय भूमिका

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

संभाजीराजे भोसले हे छत्रपती शिवाजी महाराजांचे थोरले बंधू आणि शहाजीराजांचे अत्यंत लाडके पुत्र होते. शहाजीराजे आणि जिजाऊंचे तिसरे अपत्य. संभाजीराजांचा जन्म १६२३ मध्ये झाला. ते जिजाऊंच्या सहा पुत्रांपैकी तिसरे पुत्र होते.

### बंगळूरच्या दरबारात बालपण आणि शिक्षण

संभाजीराजांचे बालपण बंगळूर येथे गेले आणि त्यांना वडिलांकडून युद्धनीती व मुत्सद्देगिरीचे बाळकडू मिळाले.

### संस्कृत आणि गनिमी काव्याचे उत्तम ज्ञान

ते लहानपणापासूनच अत्यंत धाडसी होते आणि त्यांना संस्कृत भाषेसह युद्धकलेचे सखोल ज्ञान होते.

### कनकगिरीच्या लढाईत झालेला दगाफटका

१६५५ मध्ये कर्नाटकातील कनकगिरीच्या वेढ्यात अफजल खानाने कपटाने संभाजीराजांच्या हत्येचा कट रचला.

### १६५५ मध्ये रणांगणावर आलेले वीरमरण

कनकगिरीच्या लढाईत शत्रूशी निकराचा लढा देताना संभाजीराजांना ऐन तारुण्यात वीरमरण प्राप्त झाले.

### महाराजांनी घेतला थोरल्या बंधूंच्या हत्येचा बदला

शिवाजी महाराजांनी आपल्या थोरल्या भावाच्या हत्येचा सूड घेण्यासाठीच पुढे अफजल खानाचा वध केला, असे मानले जाते.

### आजही प्रेरणा देणारा पराक्रमी वारसा


संभाजीराजांची समाधी कर्नाटकातील कनकगिरी येथे असून त्यांचा पराक्रम आजही इतिहासात अजरामर आहे.



# मराठी चित्रपटसृष्टीतील तारा : राजा परांजपे

जन्मदिन विशेष

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**




मराठी चित्रपटसृष्टीच्या सुवर्णकाळात ज्या दिग्गजांनी आपल्या कलेने मराठी चित्रपट जागतिक दर्जाचा बनवला, त्यात राजा परांजपे यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. अभिनयाची उपजत जाण, दिग्दर्शनातील वेगळेपण आणि निर्मितीमधील चोखंदळपणा यांमुळे ते खऱ्या अर्थाने मराठी चित्रपटसृष्टीचे 'भिष्मपितामह' मानले जातात.राजा परांजपे यांचा जन्म २४ एप्रिल १९१० रोजी झाला. त्यांनी अभिनय आणि दिग्दर्शन क्षेत्रात पाऊल ठेवले तेव्हा मराठी चित्रपटसृष्टी बाल्यावस्थेत होती. परंतु, आपल्या प्रतिभेने त्यांनी या क्षेत्राला एक नवी दिशा दिली.राजा परांजपे हे उत्तम अभिनेते होते. त्यांच्या अभिनयातील साधेपणा आणि नैसर्गिक संवादफेक प्रेक्षकांच्या काळजाला भिडणारी होती. त्यांनी अनेक चित्रपटांतून आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. त्यांची देहबोली आणि आवाजातील चढ-उतार पात्राला जिवंत करत असत.दिग्दर्शक म्हणून राजा परांजपे यांनी मराठी चित्रपटाला एक वेगळी उंची मिळवून दिली. त्यांनी 'जगाच्या पाठीवर', 'पडछाया', 'हा माझा मार्ग एकला', 'ऊन पाऊस' आणि 'सुवासिनी' यांसारखे अजरामर चित्रपट दिले. त्यांच्या दिग्दर्शनात मानवी नात्यांची गुंतागुंत, सामाजिक वास्तव आणि मध्यमवर्गीय जीवनाचे चित्रण अतिशय प्रभावीपणे उमटायचे. ते निसर्गाला चित्रपटाचा एक महत्त्वाचा घटक मानत, ज्यामुळे दृश्यांना एक जिवंतपणा मिळायचा. सुधीर फडके यांच्यासोबतची त्यांची जोडी मराठी चित्रपटसृष्टीतील सर्वात यशस्वी जोडी मानली जाते. त्यांच्या चित्रपटांतील गाणी आजही लोकांच्या ओठांवर आहेत.त्यांच्या कथांमध्ये नेहमीच मानवी भावना आणि मूल्यांना प्राधान्य असायचे.राजा परांजपे यांनी केवळ चित्रपटच बनवले नाहीत, तर त्यांनी मराठी चित्रपटसृष्टीला एक शिस्त आणि व्यावसायिक दृष्टी दिली. त्यांनी अनेक नवोदित कलाकारांना संधी देऊन त्यांना घडवले.आज, २४ एप्रिल रोजी त्यांच्या जन्मदिनानिमित्त या महान कलाकाराला आदरांजली वाहताना, आपण केवळ एका दिग्दर्शकाचे स्मरण करत नाही, तर एका अशा कालखंडाचा सन्मान करतो, ज्याने मराठी चित्रपटसृष्टीला समृद्ध केले. राजा परांजपे यांचे कार्य पुढील अनेक पिढ्यांच्या चित्रपट निर्मात्यांसाठी नेहमीच मार्गदर्शक आणि प्रेरणादायी ठरेल.

# यूरोप में रात के समय क्यों बहुत कम स्लीपर ट्रेनें चलती हैं?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

काटारीना शांत्स
३ अप्रैल २०२६

यूरोप और स्लीपर ट्रेनों का रिश्ता कभी जुड़ा, तो कभी टूटा। एक दौर था जब स्लीपर ट्रेनें बड़ी लोकप्रिय हुआ करती थीं, लेकिन फिर जैसे इनके दिन लद गए। क्या नाइट ट्रेनों का चलन बढ़ाने की कोशिशें रंग लाएंगी?
१२ दिसंबर की शाम थी, जब स्विट्जरलैंड के ज्यूरिख से रवाना हुई "नाइटजेट पैसेंजर ट्रेन" जर्मनी की राजधानी बर्लिन में स्टेशन के १३ नंबर प्लेटफॉर्म पर आने वाली थी. ऐन और यूरी समेत दर्जनों प्रदर्शनकारी रंगबिरंगे पजामों में तैयार खड़े थे, लेकिन ट्रेन पर चढ़ने के लिए नहीं।
जिस तरह बर्लिन स्टेशन पर ऐक्टिविस्ट जमा हुए, उसी तरह लिस्बन से लेकर हेलसिंकी तक यूरोप की १२ राजधानियों के ट्रेन स्टेशनों पर कई यूरोपीय ऐक्टिविस्ट इकट्ठा हुए. उनकी मांग है कि पूरे महाद्वीप में शहरों को जोड़ने वाली नाइट ट्रेनों की संख्या बढ़ाई जाए।



१२ दिसंबर २०२५ को ये युवा कार्यकर्ता, यूरोप में नाइट ट्रेनों की संख्या बढ़ाने के लिए प्रदर्शन कर रहे हैं। पजामा और बाथरोब पहनकर ये दिखा रहे हैं कि नाइट ट्रेनों की वजह से रात में यात्रा करना उनके लिए ज्यादा सुविधाजनक होगा।
जैसा कि नाम से जाहिर है, नाइट ट्रेन या ओवरनाइट ट्रेन ऐसी रात्रिकालीन ट्रेनों को कहा जाता है जो देर शाम किसी जगह से चलें और तड़के अपने गंतव्य तक पहुंच जाएं। यानी, ट्रेन में रात की यात्रा। भारत में रात्रिकालीन ट्रेनें बहुत आम हैं। इन ट्रेनों के स्लीपर और एसी कोच में लेटने के लिए बर्थ होती है।

जर्मनी : डॉयचे बान ने पांच महीने के लिए बंद किया मुख्य रेल मार्ग वापस आते हैं बर्लिन स्टेशन के १३ नंबर प्लेटफॉर्म पर। यहां नीली और सफेद धारियों वाली पोशाक पहने एक ऐक्टिविस्ट ने कहा, "मैं अब विमान से यात्रा नहीं करना चाहती, क्योंकि मुझे पता है कि इससे कितना नुकसान होता है। लेकिन मेरी यात्रा की चाह अब भी बरकरार है।" ऐन की बेटी ने बताया, "ट्रेन में बड़ी अच्छी नींद आती है, क्योंकि आपको लगातार आगे-पीछे झूलने जैसा एहसास होता है।" वहीं, यूरी का कहना था कि उन्हें ट्रेन यात्रा की सादगी बहुत भाती है। वह कहती हैं कि इसमें न तो हवाई अड्डे तक पहुंचने की दौड़- भाग है, न ही चेक-इन की लंबी लाइनें और न ही विमान की तंग सीटों पर बैठने और इंतजार करने की परेशानी। यूरी ने बताया, "मैं एक शहर में नाइट ट्रेन पकड़ती हूं और सो जाती हूं. फिर सीधे दूसरे शहर में उतरती हूं।"

नाइट ट्रेनों के प्रति आकर्षण नई बात नहीं ह। २० वीं सदी के मध्य तक तो वे यूरोप में काफी लोकप्रिय हुआ करती थीं। फिर जैसेजैसे पूरे महाद्वीप में हाई-वे का विस्तार बढ़ता गया, नाइट ट्रेनों में यात्रियों की दिलचस्पी कम होने लगी।

जर्मनी के राष्ट्रीय रेलवे को मिलेगी पहली महिला सीईओ और फिर हवाई यात्रा का प्रचलन बढ़ने लगा। १९८० का दशक आते-आते हवाई यात्रा ज्यादा किफायती होने लगी। अब हालत यह है कि जो लोग पुराने दौर की रात्रिकालीन ट्रेनों का अनुभव लेना चाहते हैं, उनके लिए गिने-चुने कनेक्शन और बहुत सीमित स्लीपर ट्रेनें उपलब्ध हैं।

विशेषज्ञ बताते हैं कि रात्रिकालीन स्लीपर ट्रेनों की लागत अपेक्षाकृत काफी ज्यादा है.नाइट सरचार्ज के कारण कर्मचारियों का भुगतान बढ़ जाता है। साथ ही, सामान्य ट्रेन कोच की तुलना में स्लीपर डिब्बों के भीतर कम यात्री सफर कर पाते हैं।

सरकारी रेलवे नेटवर्क में कटौतीः संपर्क क्यों टूट रहे हैं साल २०२३ की बात है, जब ऑस्ट्रिया में एक बदलाव देखा गया। 'ऑस्ट्रियन फेडरल रेलवे' ने पेरिसबर्लिन और विएना के बीच लोकप्रिय रास्तों को दोबारा चालू किया। मगर, यह ज्यादा दिन चला नहीं। दो साल बाद ही, फ्रांस में सरकारी सब्सिडी में कटौती के चलते इस मार्ग का संचालन फिर रोक दिया गया। अब इस रूट को 'यूरोपियन स्लीपर' नाम के एक बेल्जियमडच नाइट ट्रेन ऑपरेटर ने अपने हाथ में ले लिया है। इस रूट में ब्रसेल्स को भी स्टॉप बनाया जाएगा।

तेज गर्मी सड़क, रेल और पुलों के लिए भी बड़ी आफत है हाल ही में स्वीडिश सरकारी रेलवे ने भी बर्लिनस्टॉकहोम रूट से हटने का फैसला किया है। इस मार्ग की शुरुआत २०२२ में ही हुई थी। इनमें से कुछ रास्तों को अब निजी कंपनियां 'यूरोपियन स्लीपर' और अमेरिकी समूह 'आरडीसी' संभालेंगी। हालांकि, ट्रेनें नियमित नहीं बल्कि चुनिंदा दिनों पर ही चलेंगी। परिवहन विशेषज्ञ फिलिक्स बेरशिन बताते हैं, "आज भी यूरोप में नाइट ट्रेनें मौजूद हैं, इसका श्रेय यूरोपियन स्लीपर जैसे आदर्शवादियों को जाता है।" वह बताते हैं कि यह कंपनी बड़ेपैमाने पर क्राउडफंडिंग के जरिए रकम जुटाती है। साल २०२४ में बेरशिन ने जर्मनी के केंद्रीय परिवहन मंत्रालय के लिए यूरोप में नाइट ट्रेन यातायात की पड़ताल की। वह इस निष्कर्ष पर पहुंचे कि आमतौर पर ज्यादा लागत के कारण स्लीपर कोच वाली ट्रेनें ऑपरेटरों के लिए घाटे का सौदा होती हैं। रात्रिकालीन ट्रेनों पर नाइट सरचार्ज की वजह से कर्मचारियों का भुगतान बढ़ जाता है।

इसके अलावा, सामान्य ट्रेन कोच की तुलना में स्लीपर डिब्बों के भीतर कम यात्री सफर कर पाते हैं। मसलन, जर्मन रेलवे ऑपरेटर डॉयचे बान (डीबी) की आईसीई-४ जैसी हाईस्पीड ट्रेनें ९१८ की संख्या तक यात्रियों को ले जा सकती हैं। वहीं, ऑस्ट्रियन फेडरल रेलवे की नाइटजेट जैसी स्लीपर ट्रेनों में यह संख्या घटकर २५४ रह जाती है। इसी तरह, फिनलैंड में इसी तरह की स्लीपर ट्रेन की क्षमता लगभग ५०० यात्रियों की है।

# योगासन करण्याची योग्य वेळ कोणती?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आयुर्वेदामध्ये योगाभ्यासासाठी वेळेला अत्यंत महत्त्व आहे. कारण शरीरातील दोष (कफ, पित्त, वात) काळानुसार बदलत असतात.

**सकाळची वेळ (कफ काळ) :** सकाळी शरीर जड आणि मन सुस्त असते, अशा वेळी योगा केल्याने शरीरात नैसर्गिक ऊर्जा निर्माण होते.

**सकाळच्या योगाचे फायदे :** आळस, कमी ऊर्जा, वजन वाढणे आणि पचनसंस्थेच्या तक्रारी दूर करण्यासाठी सकाळचा योगाभ्यास हा एखाद्या औषधासारखा काम करतो. सकाळचा योगा केवळ शरीरच नाही, तर मज्जासंस्था संतुलित करून दिवसभर एकाग्रता वाढवण्यास आणि तणाव कमी करण्यास मदत करतो.

**सायंकाळची वेळ (वात काळ) :** ही वेळ तणावमुक्ती आणि चिंता दूर करण्यासाठी योग्य असून, यावेळी शांत आणि संथ योगासने करावीत.

**सर्वांत मोठी चूक** : रात्रीच्या वेळी अतिशय वेगाने किंवा जास्त ऊर्जेचा व्यायाम केल्याने झोपमोड होऊ शकते आणि अस्वस्थता वाढते.



**आयुर्वेदाचा सल्ला** : सकाळी 'सूर्य नमस्कार' सारखे ऊर्जा देणारे प्रकार करावेत, तर सायंकाळी दीर्घ श्वसन आणि शरीर शांत करणारी स्ट्रेचिंग करावी. केवळ वेळ आहे म्हणून व्यायाम करण्यापेक्षा तुमच्या शरीराला नेमकी कधी गरज आहे हे ओळखून योगा करणे म्हणजे खऱ्या अर्थाने 'आयुर्वेदिक जीवनशैली' होय.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे
तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे






# ब्रह्मदेवाचा (ब्रम्हांडाचा) एक दिवस

## या कालावधीत पृथ्वीवर चार महायुगे एक हजार वेळा होतात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

१) कलियुगाची वर्षे (कालावधी) सुमारे ४ लाख ३२ हजार. यामध्ये सुरूवातीला बौद्ध व शेवटी कल्की हे दोन अवतार होतात.
२) द्वापारयुगाची वर्षे (कालावधी) कलियुगाच्या दुप्पट म्हणजेच सुमारे ८ लाख ६४ हजार वर्षे. यामध्ये शेवटी बलराम व श्रीकृष्ण हे दोन अवतार एकत्रित एकदाच एक म्हणून होतात.
३) त्रेतायुगाची वर्षे (कालावधी) कलियुगाच्या तिप्पट म्हणजेच सुमारे १२ लाख ९६ हजार वर्षे. यामध्ये सुरूवातीला परशुराम व शेवटी श्रीराम हे दोन अवतार होतात.
४) कृत म्हणजेच सत्ययुगाची वर्षे (कालावधी) कलियुगाच्या चौपट म्हणजेच सुमारे १७ लाख २८ हजार वर्षे. यामध्ये सुरूवातीला मत्स्य (मासा), कच्छ (कासव) मध्यावर वराह, नरसिंह शेवटी वामन हे पाच अवतार होतात.

**अवतार कार्य**

विष्णूंच्या दहा प्रमुख व एकूण २४ अवतारांप्रमाणेच देवीचे दहा अवतार, श्रीगणेशांचे दहा अवतार, रुद्र म्हणजे भगवान शंकर यांचे दहा अवतार, असे सर्व देवांचे विविध अवतार कार्य सुरू असते. ब्रह्मदेवाचा (ब्रह्मांडाचा) एक दिवस असतो तेवढ्याच लांबीची त्याची रात्रही असते. रात्रीच्या कालावधीत होणारे अवतार व कार्य अद्याप मनुष्यमात्रांपर्यंत उपलब्ध झालेले नाहीत.

प्रभू श्रीरामचंद्र यांचा अवतार समाप्त करताना हनुमंतजींजवळ असल्यास अवतार समाप्ती करता येणार नाही. हे जाणून श्रीरामांनी आपल्या दरबारातील एका जमिनीवरील छिद्रात आपल्या बोटांमधील राजमुद्रिका म्हणजे अंगठी हेतुपुरस्सर पाडली आणि ती शोधून आणण्याचे काम हनुमंतजींना दिले. हनुमंतजी सूक्ष्म रूप घेऊन त्या छिद्रात दाखल झाले तर ते छिद्र सरळ पातळ लोकापर्यंत हनुमंतजींना घेऊन गेले.

तेथील वासुकी नागास बघून हनुमंतजींनी प्रभू श्रीरामांची अंगठी कोठे आहे हे विचारताच वासुकीने त्याला समोर पडलेल्या अंगठ्यांचा ढीग दाखविला आणि सांगितले, की प्रत्येक त्रेतायुगात



त्याच्या पाताळ लोकांच्या राज्यात एक अंगठी येऊन पडते आणि त्या अंगठीच्या शोधकार्यासाठी एक वानर त्याच्या राज्यात येत असते. त्यावेळी हनुमंतजींना त्यांचे व प्रभू श्रीरामांचे किती अवतार होऊन गेले यांचे स्मरण झाले. हनुमंतजी अंगठीविनाच श्रीराम राज्यात परतले. परंतु तोवर श्रीराम आणि सर्व भावंडांनी आपापले अवतार कार्य संपवून या लोकातून प्रस्थान केले होते. हनुमंतजी चिरंजीव असल्यामुळे कलियुगाच्या अंतापर्यंत हनुमंतजी पृथ्वीवर राहतील आणि नंतर पुढील सत्ययुगात ते ब्रह्मदेवाची जागा घेतील.

अवकाशामध्ये म्हणजेच स्पेसमध्ये ज्या ग्रहांवर प्रकाश पडतो ते आणि तेवढेच विश्व मनुष्यमात्राला दिसते. परंतु ब्रह्मांडाचा बहुसंख्य भाग काळोखात असल्याने त्याचे रहस्य काय आहे हे अजून उजेडात येत नाही. या गोष्टीला खगोलाचे डार्क सिक्रेट असे संबोधण्यात येते. येथे कालमान कसे चालते हे समजणे अजून माणसाच्या आवाक्या बाहेर आहे. या ठिकाणचे भौतिकशास्त्राचे नियम अजूनही मानवाच्या आकलनाच्या बाहेर आहेत. शुक्ल यजुर्वेदात ब्रह्मदेवाच्या दिवसा होणाऱ्या अवतारकार्यांबद्दल सगळी माहिती अवलोकन करता येते. परंतु ‘कृष्ण यजुर्वेद अजूनही पूर्णपणे पृथ्वीवर आलेला नाही’ हे विधान श्री गुरुचरित्रात केले गेलेले आहे.

**ब्रह्मदेवाचा एक दिवस म्हणजे एक कल्प**

कल्प हा सुमारे ४.३२ अब्ज पृथ्वी वर्षांचा कालावधी असतो. ज्यामध्ये सृष्टीची निर्मिती आणि पालन होते यालाच ‘कल्प’ म्हणतात. ज्यामध्ये १००० महायुगे (सत्य, त्रेता, द्वापर, कलियुग) समाविष्ट आहेत. ब्रह्मदेवाच्या दिवसात सृष्टी प्रकट होते, तर रात्री ती नष्ट होते.

**ब्रह्मदेवाच्या दिवसाचे प्रमुख तपशील**

दिवसाचा कालावधी (कल्प) : १,००० महायुगे किंवा सुमारे अब्ज (४,३२०,०००,०००) मानवी वर्षे. पंढरपूरचा विठोबा हा कलियुगापासून पुढची २८ युगे पंढरपूरमध्ये निवास करणार असून तेथूनच ब्रह्मांडाचे नियंत्रण करणार आहे. त्यानंतर कालोचित जलप्रलय होऊन पुन्हा नवीन सृष्टी उत्पन्न होऊन पुढील कार्य सुरू राहील.

**ब्रह्मदेवाची रात्र**

दिवसाच्या बरोबरीची (४.३२ अब्ज वर्षे) असते. ज्यामध्ये विश्व सुप्तावस्थेत असते.

एक पूर्ण दिवस (अहोरात्र) २,००० महायुगे किंवा ८.६४ अब्ज मानवी वर्षे.

**सध्याची स्थिती**

सध्याचा कल्प हा ‘वराह कल्प’ आहे आणि ब्रह्मदेवाचे ५१ वे वर्षे चालू असल्याचे मानले जाते.

**मन्वंतर (मनुकाळ)**

ब्रह्मदेवाच्या एका दिवसात १४ मन्वंतरे (मनूंचा काळ) असतात.
एक कल्प (ब्रह्माचा एक दिवस) मध्ये १४ मन्वंतरांचा समावेश असतो, त्या प्रत्येकाचे प्रमुख मनु (शासक) असतात. सध्या सातवे वैवस्वत मन्वंतर सुरू आहे.

**१४ मन्वंतरांची नावे**

१) स्वयंभुव
२) स्वरोचिष
३) उत्तम
४) तामस
५) रैवत
६) चाक्षुष
७) वैवस्वत
८) सावर्णी
९) दक्षसवर्णी
१०) ब्रह्मसावर्णी
११) ब्रह्मसावर्णी
१२) रुद्रसावर्णी
१३) देवसावर्णी
१४) इंद्रसावर्णी

ब्रह्मदेवाची १०० वर्षे ही त्यांच्या संपूर्ण आयुष्याचा कालावधी मानला जातो. त्यानंतर विश्व विसर्जित होते.

# भगवान श्रीनृसिंह नवरात्र

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

श्रीनृसिंह नवरात्र आज पासून नृसिंह नवरात्र घटस्थापना सुरू झाली आहे .नृसिंह हा भगवान विष्णुच्या दशावतारांमधिल चौथा अवतार आहे.नृसिंहाचे नवरात्र वैशाख शुद्ध षष्ठी ते चतुर्दशी असे साजरे केले जाते.

**उपासना :** प्रत्येक महिन्याच्या कृष्ण अष्टमीस नृसिंहव्रत, गुरुवारी येणार्या त्रयोदशीस त्रयोदशी व्रत, फाल्गुन वद्य द्वादशीस द्वादशी व्रत अशी उपासना केली जाते.शनिवार हा नृसिंहाचा वार सांगितला आहे.पंचमुखी हनुमान स्तोत्रांत पूर्वेकडे वानरमुख व दक्षिणेकडे नृसिंहमुख असे म्हटले आहे. अत्युग्रतेजो ज्वलंतम् भीषणं भयनाशनम् असे या मुखाचे वर्णन आहे. पश्चिमेकडील मुख गरुडाचे असून उत्तरेकडील मुख भगवान वराहांचे आहे. पांचवे मुख हयानन म्हणजे घोड्याचे तुंबरु स्वरुपांतील आहे. या पंचमुखी हनुमान स्वरुपांत भगवंताचे दोन अवतार आहेत व तीन अवतार भक्त स्वरुपांत आहेत. म्हणून हनुमंताचे पूजा, उपासनेने नृसिंहांची पूजा, उपासना आपसूकच घडते.या ठिकाणी भक्त व भगवान एके ठिकाणी आहेत. असा हा हनुमंताचा अवतार आहे.

**नृसिंहाची पूजा :** मूर्तीस स्नान घालावे. नंतर पंचामृत, पंचगव्य आदीने स्नान घालावे. मग कुंकूम, चंदन, केशर यांचे लेपन करावे. मालती, केवडा, अशोक, चाफा, बकुळ, तुळस आदी फुलांनी पूजा करावी. मग तूप, साखर, तांदूळ, जव आदीच्या खिरीचा नैवेद्य दाखवावा. शेवटी आरती करावी असे नृसिंह पुराणांत सांगितले आहे. कलियुगांत जो भक्तियुक्त अंतःकरणाने श्रीनृसिंहाचे पूजन करील त्याचे सर्व मनोरथ पूर्ण होऊन, त्याच्या सर्व शत्रूंचा नाश होऊन तो मोक्षाचा अधिकारी होतो.नरसिंह चतुर्दशीचे व्रतहे व्रत विष्णुभक्तांनी व संकटनाशाची इच्छा करणारांनी दरवर्षी वैशाख शुक्ल चतुर्दशीला निष्ठेने करावे. व्रताचे पंचामृतस्नान, पूजा व उपवास असे हे तीन मुख्य विधी आहेत. ह्या व्रतास चतुर्दशीच्या दिवशी माध्यान्ह कालापासून सुरुवात करुन दुसर्या दिवशी घरांतील सर्वांनी एकत्र उपवास सोडावा व सांगता करावी.चतुर्दशीच्या दिवशी दुपारी अंगाला मृतिका, गोमय, आवळे व तीळ लावून स्वच्छ स्नान करावे. जवळ नदी, समुद्र असेल तर तेथे जाऊन स्नान करावे.पूजेस सुरुवात करण्याआधी श्रीनृसिंहाची खालील प्रमाणे प्रार्थना करावी.

**नृसिंहं देवदेवेशं तव जन्मदिने शुभे ।उपवासं करिष्यामि सर्वभोगविवर्जितम् ।श्रीनृसिंहमहोग्रस्त्वं दयां कृत्वा ममोपरि ।अद्याहं प्रविधास्यामि व्रतनिर्विघ्नतां नय ।**

पूजा सायंकाळी करावयाची असते. ते स्थान स्वच्छ करावे,गाईच्या शेणाने सारवून घ्यावे. फरशी असल्यास स्वच्छ धूवून काढावी. त्यावर भगवंताचे स्मरण करुन अष्टदल काढावे. त्यावर तांब्याचा तांब्या पाण्याने भरुन ठेवावा. तांब्यावर ताम्हण ठेवावे. त्यात गहू भरुन श्रीनृसिंहाची मूर्ती विधिपूर्वक ठेवावी. अक्षता व पुष्पे वाहून ' भगवान नृसिंह आपण येथे यावे.' असे आवाहन करावे. विधिपूर्वक आसन पाय धुण्यासाठी पाणी अर्पण करावे. अर्घ्य व आचमन द्यावे. त्यांची पूजा करावी. पूजा करतांना शक्य असल्यास शंख नाद, नगारा वाजवावा. नंतर प्रतिमेस पंचामृताने, गरम पाण्याने व उटणे लावून स्नान घालावे. मल्लिका, मालती, केतकी, अशोक, चाफा, पुन्नाग, नागकेसर, बकुल, उत्पल, तुळस, कण्हेर पलाश पुष्पे अर्पण करावी. या फुलांची देवास माला घालावी. अखंड बिल्वपत्रे व तुलसीदलेही अर्पण करावीत. पूजा करुन महिष, गुग्गुल, तूप व साखर यांनी तयार केलेला धूप अर्पण करावा. दीप ओवाळून महानैवेद्य दाखवावा. हविष्य, तूप, साखर, तांदुळ जवाची लापशी, खीर यांचा नैवेद्य अर्पण करावा.नंतर आरती आळवणी करावी. प्रदक्षिणा घालावी. भगवंताचे स्तोत्र म्हणावे. मूर्ती नसल्यास फोटोची पूजा करावी. चतुर्दशीच्या रात्री जागरण करावे. नृसिंहपुराणांतील कथा श्रवण करावी. जप करावा.दुसरे दिवशी सकाळी स्नान करुन पूजा करावी. नरसिंहाचा शांतपणे जप करावा. सत्पात्र व्यक्तीस भोजन द्यावे व यथा शक्ती दक्षिणा द्यावी. हे व्रत समाजांतील सर्व लोकांना करता येण्यासारखे आहे.फलप्राप्तीमनोकामना पूर्ण होतात, पुत्र प्राप्तीची अपेक्षा असेल तर तसे होते मात्र पूर्ण भक्तीयुक्त अंतःकरणाने हे व्रत करावे. घरांतील कटकटी दूर होतात व संसार सुखाचा होतो. निर्धनी कुबेर होतो. शत्रुनाश होतो. भूतबाधा दूर होते.

# आज गंगा सप्तमी त्यानिमित्ताने..

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वैशाख शुक्ल सप्तमी तिथीला गंगामाता स्वर्ग लोकातून शिवशंकराच्या जटांमध्ये पोहचली होती. म्हणून या दिवशी गंगा सप्तमी साजरी केली जाते. गंगा सप्तमीला गंगा नदीत स्नान केल्याने पाप नाहीसे होतात आणि मोक्षाची प्राप्ती होते असे मानले गेले आहे. गंगा स्नानाचे आपले महत्त्व आहेच तरी या दिवशी गंगा स्नान केल्याने सर्व दुःखापासून मुक्ती मिळते. या दिवशी गंगा मंदिरांसह इतर मंदिरात देखील या निमित्ताने पूजा केली जाते. गंगा नदीत स्नान केल्याने मोक्ष प्राप्ती होते. तसेच या दिवशी दान-पुण्याचं विशेष महत्त्व असल्याचे सांगितले गेले आहे.✻ जर गंगा नदीत स्नान करणे शक्य नसेल तर गंगा नदीच्या पाण्याचे काही थेंब सामान्य पाण्यात मिसळून स्नान करावे.✻ आंघोळ झाल्यावर आपण गंगा मातेच्या मूर्तीची पूजा करू शकता.✻ या दिवशी भगवान शिव यांची पूजा देखील शुभ मानली जाते.✻ त्याशिवाय गंगेला आपल्या तपामुळे पृथ्वीवर आणणाऱ्या भगीरथांची पूजा देखील करावी. महाराज भागीरथ एक प्रतापी राजा होते. त्यांनी आपल्या पूर्वजांना जीवन-मरण या दोषापासून मुक्त करण्यासाठी गंगा मातेला पृथ्वीवर आणण्याचा निश्चय केला. त्यांनी कठोर तपस्या केली. तपस्येला प्रसन्न होऊन गंगामाता स्वर्गाहून पृथ्वीवर येण्यास तयार झाली. परंतु त्यांनी भागीरथांना म्हटले की



जर त्या स्वर्गातून सरळ पृथ्वीवर आल्या तर त्यांचा वेग पृथ्वी सहन करु शकणार नाही आणि पाताळात जाईल.हे ऐकून भागीरथ विचारात सापडला. गंगा मातेला अभिमान होता की कोणीही तिचा वेग सहन करु शकणार नाही. तेव्हा भगीरथाने महादेवांची उपासना सुरु केली. संसाराचे दुःख हरण करणारे शिव शंभू प्रसन्न झाले आणि भागीरथाला वर मागण्यास सांगितले. भागीरथाने आपल्या मनाची इच्छा सांगितली.गंगा माता जशी स्वर्गातून पृथ्वीकडे वळू लागी गंगा मातेचा गर्व दूर करण्यासाठी शंकरांनी आपल्या जटांमध्ये कैद केलं. यावर गंगा मातेने शंकरदेवाकडे माफी मागितली. तेव्हा शिवजीने आपल्या जटांच्या एक लहानश्या पोखरमध्ये त्यांना सोडले तेथून गंगामाता सात धारांमध्ये प्रवाहित होऊ लागली. गंगामातेणे आपल्या पुण्याईमुळे जनतेला उपकृत केले.युगानुयुगापासून वाहणारी गंगामाता महाराज भगीरथ यांच्या कष्टमयी साधनेची कहाणी सांगते. गंगामाता प्राण्यांना केवळ जीवनदान नव्हे तर मुक्ती देखील देते.

# भक्त आणि परमात्मा एकरूपच!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

‘आमच्या हातून वारंवार चुका होतात’ असे तुम्ही म्हणता. लहान मुलगा चालताना अडखळतो, पडतो किंवा बोलताना बोबडे बोलतो त्याचे आई-बापांना कौतुकच वाटते. त्याचप्रमाणे तुमच्या चुकांचे मला कौतुक वाटते. चुका सावरण्याच्या तुमच्या प्रयत्नांचेही तसेच कौतुक वाटते. म्हणून त्याबद्दल तुम्ही काहीही मनात आणण्याचे कारण नाही. गुरूने एकदा सांगितले, की ‘तुझे मागचे सर्व गेले, पुढे मात्र वाईट वागू नकोस’ तर शिष्याने ते श्रद्धेने खरे मानावे. आपल्या हातून होणाऱ्या चुकांचे परिमार्जन नामच करू शकते. भगवंताचे नाम हे सर्व रोगांवर रामबाण औषधच आहे. नामाचे हे औषध सतत थेंब-थेंब पोटात गेले पाहिजे. ऑफिसमध्येसुद्धा ते आपण बरोबर घेऊन जावे. विद्वान, अडाणी, श्रीमंत, गरीब सर्वांना हे औषध सारखेच आहे. जो पथ्य सांभाळून हे औषध घेईल त्याला गुण लवकर येईल.

एखादा मुलगा ‘मी विहिरीत उडी घेणार’ म्हणून हट्ट धरून बसला तर बापाने त्याचा हा हट्ट पुरवायचा का त्याला समजावून किंवा तोंडात मारून तेथून बाजूला काढायचे? त्याप्रमाणे तुमचे विषय मागण्याचे हट्ट आहेत. खरा भक्त कधीही दुःखी-कष्टी असत नाही, आपल्या समाधानात असतो; मग तो कितीही दरिद्री किंवा व्याधीग्रस्त असेना. अमुक एक हवे ते मिळाले नाही म्हणजे सामान्य माणसाला दुःख होते. भक्ताला कसलीही आस नसते. त्यामुळे त्याला दुःख नसते. तो आणि परमात्मा एकरूपच असतात. परमात्म्याची इच्छा हीच त्याची इच्छा असते. सगुणाची भक्ती करता करता त्याला ‘मी’चा विसर पडत जातो. ‘मी नसून तूच आहेस’ ही भावना दृढ होत जाते. शेवटी ‘मी’ नाहीसा झाला की श्रीराम, श्रीकृष्ण वगैरेही नाहीसे होतात आणि परमात्मा तेवढा शिल्लक उरतो.

आजारामधून उठलेल्या अशक्त माणसाने जसे काठीच्या आधाराने चालावे, त्याप्रमाणे प्रांपचिकाने सगुणभक्तीने तरून जावे. देहबुद्धी असणाऱ्या माणसाला सगुणावाचून भक्तीच करता येणार नाही. भगवंताला आपण सांगावे, की ‘भगवंता, तुझी कृपा मजवर असू दे; आणि कृपा म्हणजे, तुझे स्मरण मला अखंड राहू दे.’ यातूनच त्याची भक्ती उत्पन्न होईल. भगवंतावाचून कशातही समाधान नाही. त्याच्याशिवाय जगण्यात आनंद नाही. जो भगवंताचा झाला, म्हणजे त्याच्या नामात राहिला, त्याला जगण्याचा कंटाळा येणार नाही. परमात्म्याला प्रपंचरूप बनविण्याऐवजी आपण प्रपंचाला परमात्मरूप बनवावे.

# दुःख वाटेला येऊ नये म्हणून काय कराल?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

## संत-महात्मे काय सांगतात ते जाणून घेऊया...

साधारणतः प्रत्येकाला आपल्या जीवनात दुःख येऊ नये असे वाटणे स्वाभाविक आहे. काही लोक दुःख आपल्या वाट्याला येऊ नये म्हणून कर्मकांडाच्या नादी लागतात. जी घटना घडणार आहे ते घडणारच आहे त्याचे दुःख होऊ नये यासाठी काय करावे तुकोबाराय सांगतात, की **आम्ही विष्णुदासी देव ध्यावा चित्ते। होणार ते होते प्रारब्धेचि॥**

आम्ही विष्णुदासांनी देवाला तेवढे मनात ठेवावे, (बाकी प्रारब्धाला बदलण्यासाठी काहीही कर्मकांड करण्याची गरज नाही. कारण) जे व्हायचे ते प्रारब्धानुसार होणारच आहे. प्रारब्धाला बदलता येत नाही, हे संतवचन जोपर्यंत आपण आपल्या बुद्धीने समजून घेणार नाही तोपर्यंत आपली कर्मकांडातून सुटका होऊ शकणार नाही. जे प्रारब्धात असेल ते होणारच आहे आपण विष्णुदासांनी मनात देवाचे चिंतन करावे. आपण आपल्या शुद्ध भावनेने केलेले नामस्मरणही पुरेसे आहे. संतशिरोमणी नामदेव महाराजांनी आणि माऊली ज्ञानेश्वरांनी नाममंत्र दिला. **‘योग याग विधी येणें नव्हेंची सिद्धी । वायाच उपाधी दंभधर्म ॥’** असे सांगून ठेवले आहे. आणि तसेही माऊलींनी एकदा नाही तर दोनदा सांगून ठेवलेच आहे, **‘हरी मुखे म्हणा, हरी मुखे म्हणा । पुण्याची गणना कोण करी? ॥’**

आध्यात्मिक क्षेत्रात नाममहात्म्याचे एक वेगळे स्थान आहे. फक्त ईश्वराचे नाम घेतले तर नामाने काय काय साध्य होते? संत सेना महाराज म्हणतात, की **‘घेता नाम विठोबाचे । पर्वत जळती पापाचे ॥ ऐसा नामाचा महिमा । वेद शिणला झाली सीमा ॥ नामे तारिले अपार । महापापी दुराचारी ॥ वाल्या कोळी ब्रह्महत्यारी । नामे तारिला निर्धारी ॥ सेना बैसला निवांत । विठ्ठल नाम उच्चारित ॥’** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात, की **‘नामे तारिले पाषाण ॥’** याचा संदर्भ रामायणातील या घटनेशी आहे. संतशिरोमणी नामदेव महाराजांनी नामवेद दिला. फक्त नाव घ्या तो ईश्वर तुम्हाला पावतो आणि तुमच्यासाठी मदतीला धावतो. संतशिरोमणी नामदेव महाराज म्हणतात, की **‘न लगती स्तोत्रें नाना मंत्र तंत्रे । वर्णिजे बा वत्रें श्रीरामनाम ॥ अनंत पुण्यरासी घडे ज्या प्राण्यासी । तरीच मुखाशी नाम येत ॥’** संत चोखामेळा म्हणतात, की **‘नामापरता मंत्र नाही त्रिभुवनी । पाप ताप नयनी न पडेची ॥ वेदाचां अनुभव शास्त्राचा अनुवाद । नामचि गोविंद एक पुरें ॥’** दुसऱ्या एका अभंगात संत



चोखोबा म्हणतात, की **‘आणिक साधने आहेत भूता परी । नामाची ती सरी न पवती ॥ म्हणोनि सुलभ विठ्ठल एक नाम । गाता नाचता प्रेमे मुक्ती तया ॥ चोखा म्हणे माझा अनुभव उघडा । भव भय पीडा येणे वारे ॥’**

वृंदावनचे प्रेमानंद महाराज हेच आजकाल सांगतात फक्त नाम घ्या तुम्हाला जे आवडेल ते. जेव्हा आपण ईश्वराचे नामस्मरण चिंतन करतो त्यावेळेस आपली चिंता दूर करणे हे देवाचे कर्तव्य होऊन बसत. कोणावर, कधी, कोणते संकट कोसळेल ते कोणी सांगू शकत नाही.जीवनात सर्व वेळ सारखी नसते. कधी कोणाची वेळ फिरेल ते सांगता येत नाही. राजाचा रंक होतो, रंकाचा राव होतो. यामागील कारणे नेहमीच माणसाच्या आवाक्यातली असतीलच असे नाही.

माणसाने परिस्थितीवर मात करण्याचा प्रयत्न करावा. त्यात हयगय करू नये. चुकारपणा करू नये. कर्मकांडात गुंतू नये. तुकोबाराय म्हणतात, की **‘ओले मूळ भेदी खडकाचे अंग । आभ्यासासी सांग कार्यसिद्धी ॥ नव्हें ऐसे काही नाही अवघड । ज्यांसी कईवाड तोचि वरी ॥दोरे चिरा कांपे पडिता कांचणी । अभ्यासी सेवनी विष पडे ॥ तुका म्हणे कैंचा बैसण्यासी ठाव । जठरी बाळा वाव एकाएकी ॥’**, **‘असाध्य ते साध्य करिता सायास । कारण अभ्यास तुका म्हणे ॥’** तसेच ‘प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेलही गळे’ असेही तुकोबारायांनीच म्हटले आहे. पण त्या प्रयत्नांनाही काही मर्यादा असतात. त्या मर्यादांच्या पलीकडे फारसे जाता येत नाही. जेव्हा अशी वेळ येते तेव्हा मग माणसाने थांबावे. थांबावे लागल्याचे वाईट वाटून घेऊ नये. दुःख उगाळत बसू नये. दुःसाहस करू नये. तर शांतपणे सत्य स्वीकारावे. नाहीतर कपटी माणसे किंवा भोंदू बाबा मग कर्मकांडाची तहान लावतात आणि मग आपण या त्यांच्या मायेत गुंतत जातो. अर्थात ते गुंततात, ज्यांच्यात चांगल्या वाईटाची, खऱ्या खोट्याची, योग्य अयोग्यतेची जाणीव वा शहाणपण नसते. रोज नवीन निघणाऱ्या बाबा किंवा महाराजांना हे विसरत नाहीत. चमत्काराची अपेक्षा ठेवत ते त्यांच्या अधीन होतात आणि निर्बुद्ध असल्याचे सिद्ध करतात. इकडे जाणारे अडाणी लोकांना कळत नाही पण उच्चशिक्षित बुद्धिमान लोकसुद्धा निर्बुद्धासारखी का वागतात याची कीव येते. कीव व्यक्त करताना तुकोबाराय म्हणतात, की **‘काय सांगो देवा? भुलले जीव । बहु यांची येतसे कीव ॥’**

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)